हिंदु संघटन आणि हिंदु राष्ट्राच्या स्थापनेसाठी कार्यरत

# हिंदु जनजागृति समिति

नोंदणी क्र. : 1540/I-634, १२.११.२००२, फोंडा, गोवा.

भ्रमणध्वनी
९३२६१०३२७८
ई-मेल
contact@HinduJagruti.org
संकेतस्थळ
www.HinduJagruti.org

नोंदणीकृत कार्यालय : 'मधु स्मृति', घर क्र. ४५७, पहिला मजला, बैठक सभागृह, सत्यनारायण मंदिराजवळ, ढवळी, फोंडा, गोवा ४०३ ४०१.

।। जयतु जयतु हिन्दुराष्ट्रम् ।।

दिनांक : ३०.३.२०१५

प्रति,
माननीय संपादक / मुख्य वार्ताहर

**कृपया प्रसिद्धीसाठी**

**नागझर, पेडणे येथे हिंदु धर्मजागृती सभा**

**'घरी परतणे'(घरवापसी) या कार्यक्रमाला विरोध करू अशी भाषा करून आमदारांनी हिंदूंच्या वाटेला जावू नये !**
**- शिवप्रसाद जोशी, गोवा अध्यक्ष, हिंदु महासभा**

पेडणे, ३० मार्च – 'गोव्यात **'घरी परतणे'(घरवापसी)सारखे कार्यक्रम झाल्यास** त्याला विरोध करणारा मी पहिला आमदार असेन, असे वक्तव्य भाजपच्या गोव्यातील एका अन्य पंथीय आमदाराने गोवा विधानसभेत नुकतेच केले होते. हिंदूंच्या वाटेला याल तर तुमचा पंथ बाकी राहणार नाही, हे धर्मांतरीत हिंदूंना पुन्हा हिंदु धर्मात आणण्यास (घरवापसीला) विरोध करणाऱ्या गोव्यातील आमदारांनी लक्षात ठेवावे', अशी चेतावणी हिंदु महासभेचे गोवा अध्यक्ष श्री. शिवप्रसाद जोशी यांनी श्री वंसदेव सभागृह, नागझर, पेडणे, गोवा येथे २९ मार्च या दिवशी झालेल्या हिंदु धर्मजागृती सभेत दिली. या वेळी सनातन संस्थेच्या सौ. लता ढवळीकर आणि हिंदु जनजागृती सभेचे श्री. सत्यविजय नाईक उपस्थित होते.

शंखनाद झाल्यानंतर श्री. शिवप्रसाद जोशी यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने सभेला प्रारंभ झाला. श्री. राहुल वझे आणि श्री. पंकज बर्वे यांनी वेदमंत्रपठण केले. सभेला आवर्जून उपस्थित राहिलेले तोरसे जिल्हा पंचायतीचे नवनिर्वाचित सदस्य श्री. रमेश सावळ यांचे विर्नोडा पंचायतीचे पंचसदस्य श्री. शंकर परब यांनी पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. श्री. अक्षय परब यांनी हिंदु जनजागृती समितीच्या कार्याची माहिती दिली. श्री. जोशी पुढे म्हणाले, ''स्वाभिमानी आणि अभिमानी पूवर्जांमुळे आपला हिंदु धर्म अनेक आक्रमणे होऊनही टिकून राहिला आहे. या देशात फ्रान्सिस, तेरेझा आदी हिंदूंना बाटवणाऱ्यांना संतपद दिले जाते; मात्र जे हिंदु धर्माचे कार्य करतात त्यांना आतंकवादी म्हटले जाते. बिलिव्हर्सवाले हिंदूंना धर्मांतरीत करत आहेत. हे किती दिवस आम्ही सहन करणार आहोत? स्थानिक हिंदूंनी धर्मांतर करणाऱ्यांना धडा शिकवायला हवा. आपण सर्व भेद विसरून हिंदु राष्ट्रासाठी एकत्र येऊया.''

श्री. सत्यविजय नाईक म्हणाले, ''हिंदु राष्ट्र स्थापना व्हावी यासाठी जागृती करण्यासाठी या धर्मसभा आहेत. जगात ख्रिस्त्यांची १५७, मुसलमानांची ५२, बौद्धांची १२ आणि ज्यूंचे १ राष्ट्र आहे. मग जगात मानाचे असे एक हिंदु राष्ट्र का नको? देशात नक्षलवाद, आतंकवाद फोफावला आहे. देशाला शत्रूराष्ट्रांनी घेरले आहे. देशद्रोह्यांनी देशाला पोखरले आहे. हे सर्व पालटण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराजांनी दाखवलेल्या मार्गावर चालून हिंदु राष्ट्र स्थापन केल्याशिवाय पर्याय नाही.'' सौ. लता ढवळीकर म्हणाल्या, ''४ सहस्र वर्षापूर्वी संपूर्ण विश्वात असलेला हिंदु धर्म संतांची अपकीर्ती, गोहत्या, धर्मांतर, देवदेवतांचे विडंबन, मूर्तीभंजन आदी संकटांनी ग्रासला आहे. पाश्चात्त्य संस्कृतीचे आक्रमण दुरचित्रवाहिन्या, संकेतस्थळे आदी सर्व माध्यमांतून होत आहे. महिलांना भोगाची वस्तू म्हणून पाहिले गेल्याने महिलांवरील अत्याचारांत वाढ झाली आहे. कुलाचार तसेच शास्त्राचे पालन करून आपण धर्माचरण केले पाहिजे.'' या सभेचे आयोजक श्री. बाजी परब यांनी आभार मानले. कु. अरुणी गडेकर आणि श्री. पंकज बर्वे यांनी सूत्रसंचालन केले.

आपला नम्र,

डॉ. मनोज सोलंकी, राज्य समन्वयक,
हिंदु जनजागृती समिती, सं.क्र. - ९३२६१०३२७८